सोलापूर महानगरपालिका
प्रेस नोटः-

# मिळकतकर वसूलीसाठी धडक मोहीम राबवा.

तुकाराम मुंढे , जिल्हाधिकरी तथा आयुक्त सो.म.पा.

सोलापूर दि ३/४/२०१६ - सोलापूर महानगरपालिकेच्या मिळकतकर वसुली संदर्भात तुकाराम मुंढे , जिल्हाधिकरी तथा आयुक्त सोलपूर महानगरपालिका यांनी आज सकाळी ९ वा बैठक घेतली . या बैठकीत त्यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या शहर व शहरहददवाढ विभागातील मिळकत कराच्या वसुलीचा आढावा घेतला . मोठया प्रमाणात थकबाकी आहे ती वसुल करणेची कारवाई दि ४/४/२०१६ पासून हाती घेणेबाबत सहा आयुक्त अमिता दगडेपाटील यांना आदेश दिले. सोलापूर शहरात एकुण ५२ पेठा आहेत या ५२ पेठातील मिळकतकराच्या वसुलीसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र पथक तयार करुन दि ४/४/१६ रोजी ज्यांची मिळकतकराची थकबाकी ही रक्कम रुपये १ लाखाचे पुढे आहे त्यांच्यावर जप्ती वॉरंट बजावून प्रॉपर्टी सिल करणे व प्रॉपर्टी ॲटॅच करणेची कारवाई केली जाणार आहे . ज्या नागरीकांनी जागेवरच थकबाकी रोख अथवा धनादेश अथवा डिमांड ड्राप्ट ने भरलेस अशा मिळकतीचे सिल केले जाणार नाही. जर रक्कम भरणेस असमर्थता दाखविलेस अशा मिळकती या तात्काळ सिल करणेत येतील व तदनंतर लिलावची कारवाई करणेत येईल.

यानंतर दि ५/४/१६ पासून ज्या मिळकतकराची थकबाकी ही रक्कम रुपये ५० हजार ते १ लाख आहे अशा मिळकतीवर वर नमुदप्रमाणे कारवाई करणेत येईल.

दि.०६/०४/२०१६ पासून ज्या मिळकराची थकबाकी ही रक्कम रुपये २५,०००/- ते ५०,०००/- पर्यंत आहे, अशा मिळकतीवरही वरील नमुद प्रमाणे कारवाई करणेत येणार आहे.

तसेच खुल्या जागेची मिळकत कराची रक्कम थकीत आहे, अशा मिळकतदाराच्या संदर्भात त्यांच्या मिळकतीवर बोजा चढविणेत येणार आहे. तदनंतद मिळकर वसूल न झालेस लिलावाची कारवाई करणेत येणार आहे.

तरी नागरीकांनी वरील प्रमाणे कारवाई टाळणेसाठी आपला मिळकत कराची रक्कम तात्काळ भरावी असे अवहान तुकाराम मुंढे, जिल्हाधिकारी तथा आयुक्त सो.म.पा. यांनी केले आहे.

मा.संपादक,
दैनिक----------------

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.

कामगार कल्याण व जनता संपर्क
सोलापूर महानगरपालिका